महत्वाचे /परिपत्रक

जा.क्र.उमाशि-२/११ वी प्रवेश/पुवि/२०१४/ ९३५८
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : १६/१/२०१४
17 JAN 2014

प्रति

प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय
इ. ११ वी केंद्रीय प्रवेश,
पुणे व पिंपरी चिंचवड शहर परिसर, पुणे

विषय : शैक्षणिक वर्ष २०१४-१५ इ. ११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत.

संदर्भ : १) शासन पत्र क्रं. संकीर्ण-२०१३/प्र.क्र.२३६/१३/एसडी-२ दिनांक ८/१/२०१३
२) दिनांक १३/१/२०१४ रोजी झालेली सहविचार सभा.

उपरोक्त विषयाचे संदर्भान्वये सर्व प्राचार्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये पुणे व पिंपरी चिंचवड शहर परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी चे केंद्रीय प्रवेश ऑन लाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत. या संदर्भात मा. सहसचिव (विद्यार्थी विकास) शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १३/१/२०१४ रोजी झालेल्या बैठक झाली. व बैठकीमध्ये दिलेल्या सूचनांनुसार इयत्ता १० वी उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना मागदर्शन करण्यासाठी व पालकांमध्ये जाणीव जागृती निर्माण होण्यासाठी ऑनलाईन प्रवेशासंबंधीची सर्व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची सहविचार सभा दिनांक २०/१/२०१४ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्यांना कळविण्यात येते की, इ. ११ वी केंद्रीय ऑन लाईन प्रवेश पध्दतीने विद्यार्थ्यांचा प्रवेश झाल्यानंतर आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाने दयावयाचा आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रवेश **अर्ज व माहितीपत्रक** याची अधिकतम किंमत **रु. ५०/-** इतकीच असावी. त्यापेक्षा जादा प्रवेश अर्ज व माहितीपत्राची किंमत असता कामा नये याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तसेच इ. ११ वी केंद्रीय ऑन लाईन प्रवेश अंतर्गत पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील अल्पसंख्यांक कनिष्ठ महाविद्यालयांनी त्या क.म.वि ची माहिती अल्पसंख्यांक प्रमाणपत्रासह या कार्यालयाचे **श्री बन्सीलाल कामठे** लिपिक यांचेकडे **दिनांक २४/१/२०१४ दुपारी ४.००** वाजेपर्यंत आणून दयावयाची आहे. सदर माहिती व प्रमाणपत्र वेळेत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास त्यांचे नांव अल्पसंख्यांक म्हणून समाविष्ठ न करता खुल्या गटातून केंद्रीय प्रवेश पध्दतीमध्ये समाविष्ठ करण्यात येईल. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राचार्यांवर राहील याची नोंद घ्यावी.

१७/१/१४

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.
तथा
अध्यक्ष
इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती,पुणे